जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune Maharashtra – 411001
**E-Mail ID** : crimepress.pune@gov.in **Ph**.020 / 26122478

# दैनंदिन गुन्हयांची प्रेसनोट

## पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर
## प्रेस नोट दि.०१/१०/२०२३
## दि.३०/०९/२०२३ रोजी रात्रौ ००/०० वा.ते २४/०० वा.पर्यंतचे दाखल गुन्हे

### भाग-१ ते ५ चे गुन्हे

**१**

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | अंलकार पो स्टे १५२/२०२२ भादविक ३०७,३२३,५०६(२),महा.पो.का.क.३७(१)१३५,आर्म ॲक्ट ४(२५), क्रिमीनल लॉ अमेंन्डमेंट ॲक्ट क.७ |
| **फिर्यादी** | धिरज पाटोळे,वय २० वर्ष,रा.गणेशनगर एरंडवणे पुणे |
| **आरोपीत** | नरेंद महादेव बलकवडे,वय-३०,रा.सात चाळ,एरंडवणे,पुणे (अटक) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.२९/०९/२०२३ रोजी २०/०० वा.गणेशनगर एरंडवणे,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हे नमुद ठिकाणी मंडपाचे स्टेजवर बसले असताना,नमुद इसमाने फिर्यादी यांना खाली उतर असे बोलुन,फिर्यादी यांना ओढत बाजुला नेवुन,मला बघुन तु का थुंकला, आता तुझा जीवच घेतो असे म्हणुन फिर्यादी यांना जीवे ठार मारण्याचे उद्देशाने कोयता व ब्लेडने त्यांचे गळयावर वार करून,त्यांना गंभीर जखमी करून,जीवे ठार मारण्याचा प्रयत्न केला आहे. तसेच फिर्यादी यांचे मदतीला येणारे नागरीकांना धमकी देवुन,सदर परीसरात दहशत निमार्ण केली आहे. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. सुर्यकांत सपताळे ९६२३७५०३२१ |

**२**

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | बंडगार्डन पो स्टे ३०४/२०२३,भादविक ३९२,३४ |
| **फिर्यादी** | एक नागरीक,वय २८ वर्षे,रा.रायचुर,कर्नाटक |
| **आरोपीत** | १.अक्षय विजय सुर्यवंशी,वय २५ वर्षे,सध्या रा.काळेओढा,वाघोली,पुणे २.अब्दुल रहमान अबुजर तामटगार,वय २९ वर्षे,रा.अप्पर डेपो,कात्रज,पुणे (अटक) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.३०/०९/२०२३ रोजी सकाळी ११/३० वा. पुणे रेल्वे स्टेशनचे बाहेर, रिक्षा स्टॅण्ड जवळ,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हे रायचुर येथुन रेल्वेने पुणे रेल्वे स्टेशनचे बाहेर येवुन रेल्वे स्टेशनचे बाहेरील रिक्षा स्टॅण्ड जवळ बसले असताना,यातील नमुद इसमांनी आपसात संगनमत करून,त्यांचे जवळ येवुन,फिर्यादी यांना तुम्हारे पास पैसा कितना है,पैसा निकाल,पैसा देता क्या,नही तो मार दु क्या असे बोलुन,फिर्यादी यांचे खिशातील १,५००/- रूपये रोख रक्कम जबरी चोरी करून नेत असताना,फिर्यादी हे त्यांचे पाठीमागे चोर-चोर म्हणुन जोर-जोरात ओरडत असताना,तेथे एका मोटार सायकलवर असलेल्या पोलीसांनी सदर इसमांना लागलीच थोड्याच अंतरावर पाठलाग करून त्यांना ताब्यात घेतले आहे. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. गावडे ९५९४९९३१९९ |

**३**

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | भारती विद्यापीठ पो स्टे ६१८/२०२३,भादविक २७९,३०४(अ),४२७,मोव्हेॲक्ट १८४,११९/१७७ |
| **फिर्यादी** | केच्चाप्पा जनवाड, पोलीस अंमलदार, भारती विद्यापीठ पुणे शहर |
| **आरोपीत** | कंटेनरवरील चालक (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.३०/०९/२०२३ रोजी १०/३० वा. इंडीयन ऑईल पेट्रोल पंम्पाचे समोरील मुंबई-बंगलुरु हायवेवर कोळेवाडी,पुणे येथे |

| | |
|---|---|
| **तपशिल** | यातील नमुद कंटेनरवरील चालकाने त्याचे ताब्यातील कार ही वाहतुकीचे नियमांकडे दुर्लक्ष करून,हयगयीने,अविचाराने व भरधाव वेगात चालवुन,नमुद ठिकाणी रोडचे डावे साईडने जाणारे मोटार सायकलस्वार सदाशिव बाळाभाऊ नागवे,वय-५७,रा.धायरी,पुणे यांस जबर ठोस मारून,गंभीर जखमी करून,त्याचे मृत्युस कारणीभुत झाला. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. मोहन देशमुख ९७६५३९०९४३ |

४

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | शिवाजीनगर पो स्टे १९६/२०२३,भादविक ३७९ |
| **फिर्यादी** | एक महिला,वय-३६ वर्षे,रा.नवी सांगवी,पुणे |
| **आरोपीत** | अज्ञात (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.२६/०३/२०२३ रोजी १६/३० वा.नवी सांगवी बस स्टॉप शिवाजीननगर,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हया तुळशीबाग येथुन सोने खरेदी करून मनपा बस स्टॉपवरून पीएमपीएल बसने प्रवास करण्यासाठी वसंत टॉकीज ते नवी सांगवी,पुणे या रूटवरील बस मध्ये चढत असताना,कोणीतरी अज्ञात इसमाने बस मधील गर्दिचा फायदा घेवुन,फिर्यादी यांचे काळया पर्स मधील सोन्याचे दागिने ३०,००० /- रु किमतीचे चोरी करून नेले आहे. |
| **त.अंमलदार** | पोलीस अंमलदार, सोनवणे ९९२३१०८५१२ |

## दि.०१/१०/२०२३ रोजी रात्रौ ००/०० वा.ते दु.१२/०० वा.पर्यंतचे दाखल गुन्हे

१

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | सहकारनगर पो स्टे २४८/२०२३,भादविक ३०७,५०४,३४,भारतीय हत्यार कायदा कलम ४(२५), महाराष्ट्र पोलीस कायदा कलम ३७(१)(३)१३५ |
| **फिर्यादी** | एक अल्पवयीन मुलगा,वय-१७ वर्षे,रा.पद्मावती,पुणे |
| **आरोपीत** | मोटार सायकलवरील चार इसम (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.३०/०९/२०२३ रोजी २१/०० वा. दोडाप्पा मादर यांचे घराचे समोर जय अंबे चौक,तळजाई वसाहत,पद्मावती,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हे त्यांचे मित्रांसमवेत नमुद ठिकाणी बोलत थांबले असताना,फिर्यादि यांचे ओळखीचे यातील नमुद इसमांनी आपसात संगनमत करून,फिर्यादीस शिविगाळ करून,याला खुप माज आला आहे,हा आपल्याला खुन्नस देतो,याला आज संपवुन टाकायचे असे म्हणुन जीवे ठार मारण्याचे उद्देशाने त्यांचेकडील धारदार हत्याराने फिर्यादीचे दोन्ही हाताचे पंजास व डोकीस डावे बाजुस मारून,त्यांना गंभीर जखमी करून,जीवे ठार मारण्याचा प्रयत्न केला आहे. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. राहुल खंडाळे ९५५२६३५१५१ |

**जनसंपर्क अधिकारी,**
**पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर**